**CNR MHRG040006052012**

## वि.दि.मु.क.४५१/२०१२ मधील नि.११० वरील आदेश

(श्री. तुकाराम दत्तात्रेय पाटील व इतर
विरुध्द
श्री. गणू बाळू पाटील व इतर )

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१९ तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ अन्वये वादी यांच्याविरुध्द दाखल केला आहे. सदर अर्ज दावा मिळकतीच्या संरक्षणाच्या दृष्टीने शासकीय मोजणी होवून कुंपण घालण्यास परवानगी मिळावी म्हणून दाखल केला आहे.

अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-

२. सदर दावा वादीने दिनांक २०/१२/२००७ रोजी व दिनांक २१/१२/२००७ रोजीचे खरेदीखत रद्द करुन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे म्हणणे असे की, दावा मिळकतीचे खरेदीखत हे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन केलेले आहे. सदर मिळकत सुमारे रुपये १७,६०,५०,०००/- इतका मोबदला देवून नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतलेली आहे. सदर दावा मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र प्रतिवादी क्र.१९ यांनी खरेदी घेतल्यामुळे ते दावा मिळकतीचे कायदेशीर मालक झालेले आहेत. सदर यामधील वादीने एकतर्फा मनाईहुकूमाचा आदेश प्रतिवादीविरुध्द मिळवलेला आहे. प्रतिवादीनी सन २००७ व २००९ मध्ये खरेदीखताचे दस्त नोंदवून सदर दावा मिळकतीसंदर्भात सुमारे रक्कम रुपये १९,२०,९२,५००/- इतका मोबदला ग्रामस्थांना दिला असताना मनाई आदेशाचा फायदा घेवून वादी व ग्रामस्थ यांनी बेकायदेशीरपणे दावा मिळकतीत अतिक्रमण करुन घरे बांधत आहेत. सदर अशा परिस्थितीत, दावा मिळकत सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून प्रतिवादी क्र.१९ यांना कुंपण घालण्याची परवानगी दयावी असा अर्ज त्यांनी दाखल केला आहे.

३. सदर अर्जाला वादीने नि.११२ नुसार म्हणणे दाखल केले आहे. सदर त्यांच्या म्हणण्यानुसार, दावा मिळकतीसंदर्भातील मुळ बक्षिसपत्रानुसार प्रतिवादीना

दावा मिळकतीत कोणताही वैयक्तिक हक्क प्राप्त झालेला नव्हता. अशा परिस्थितीत मनाई आदेश असताना कुंपण घालण्यासंदर्भात किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप, बांधकाम, दुरुस्ती करण्याचा अधिकार प्रतिवादीना नाही. सदर गावातील सर्व गुरे चरण्यासाठी दावा मिळकत उपयोगी असून केवळ सहानभुती मिळवण्याच्या उद्देशाने प्रतिवादीने सदर अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे तो नामंजूर करण्याची वादीने मागणी केली.

४.	वादी व प्रतिवादी क्र. १९ तर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष मी त्यासमोर खालील कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी हे दावा मिळकतीस कुंपण घालण्याची परवानगी मिळवण्यास पात्र आहेत का? | नाही. |
| २ | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

५.	प्रतिवादी व वादीतर्फे याकामी विविध दस्तऐवज दाखल केले आहेत.

## मुद्दा कमांक १ व २ साठी

६.	सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता सदर दावा मिळकत प्रतिवादी क्र.१९ यांचे ताब्यात असल्याबाबत दोन्ही पक्षांनी मान्य केले आहे. सदर मनाईहुकूमाच्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१९ यांनी प्रतिवादी क्र.१ ते १८ यांच्याकडून घेतलेली दावा मिळकतीची खरेदी कायदेशीर आहे किंवा नाही हा पुराव्याचा भाग आहे. सदर दावा सन २०१२ पासून प्रलंबित असून आजतागायत सदर मिळकतीत अतिक्रमण झाल्याबाबत प्रतिवादीने कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. थोडक्यात, अशा परिस्थितीत, वादी व ग्रामस्थ दावा मिळकतीवर अतिक्रमण करत असल्याचे प्रथमदर्शनी प्रतिवादी क्र.१९ यांना शाबीत करता आले नाही. याशिवाय, प्रतिवादीनी त्यांच्या अर्जात शासकीय मोजणी करुन कुंपण घालण्याची परवानगी मिळावी असे नमूद केले आहे. परंतु, त्याकरिता शासकीय

मोजणीकरिता आवश्यक बाबींचा उल्लेख केलेला नाही. थोडक्यात सद्यपरिस्थितीत प्रतिवादी क्र.१९ यांच्या अर्जास कोणत्याही कागदोपत्री पुराव्याची पुष्टी नसल्यामुळे ती मान्य करणे न्यायोचित ठरणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

अर्ज (नि.११०) नामंजूर करण्यात येतो.

AVANI ASHWIN GODSE

Digitally signed by AVANI ASHWIN GODSE
Date: 2022.07.29 12:49:09 +0530

पनवेल {अ.अ. गोडसे}
दिनांक :२८/०७/२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,पनवेल
जिल्हा-रायगड.